नियमीत दिवाणी दावा क्र. २५/२०१७.
पमीयाबाई व ईतर वि. सुखदेव व ईतर.
निशाणी क्र. **२८ लगत.**

**वादीतर्फे साक्षीदार क्र.१**

**शपथेवर सरतपास वादीतर्फे विद्यमान वकील श्री. एस.सी.बनाईत यांच्यामार्फत सुरुः–**

शपथेवर सत्य कथन करते की, माझे संपूर्ण नाव पमीयाबाई भैय्यालाल बिहोने, वय–६० वर्षे, धंदा– शेती, राहणार– सावनेर, ता. सावनेर, जि. नागपूर असुन माझ्या सरतपासाच्या शपथपत्रातील संपूर्ण मजकुर खरा व बरोबर असुन त्याचे सत्यतेकामी मी त्यावर माझा अंगठा केला आहे.

**०७.** वर्णनयादी निशाणी क्र.०४ सोबत जोडलेल्या सातबारा उता–याच्या प्रमाणीत प्रतिस अनुक्रमे **निशाणी क्र.३२, ३३ व ३४** देण्यात येते. दिनांक ०७.०१.२०१७ रोजीच्या नोटीसवर माझ्या वकीलांची सही आहे, त्यातील मजकूर बरोबर आहे, त्यास **निशाणी क्र.३५** देण्यात येते. अधिकार अभिलेखाच्या प्रमाणीत प्रति **निशाणी क्र.३६ व ३७** वर आहेत. खासरा पाहणी पत्रकाच्या प्रमाणीत प्रतिस **निशाणी क्र.३८** देण्यात येते. दिनांक १५.०३.१९७२ रोजी झालेल्या खरेदीखताच्या प्रमाणीत प्रतिस **निशाणी क्र.३९** देण्यात येते.(यावेळी प्रतिवादीच्या वकीलांनी असा आक्षेप घेतला की, सदर दस्त जरी ३० वर्षांपूर्वीचा असेल तरीही तो मूळ दाखल करणे आवश्यक आहे, त्याचवेळी त्याचा विचार केला जाऊ शकतो. त्याचप्रमाणे सदर विक्री पत्रामध्ये साक्षीदार क्र.१ हे पक्षकार नाहीत. त्याचप्रमाणे खरेदीखत हे पब्लीक डॉक्युमेंट नाही म्हणून निशाणी देता येणार नाही. उलटपक्षी वादीच्या वकीलांनी असा युक्तीवाद केला की, सदर खरेदी खताच्या प्रमाणीत प्रतिस देखील भारतीय पूरावा कायदा कलम ९० अन्वये विचारता घेता येईल त्यामूळे त्यास निशाणी देण्यात यावी. सदर मुद्दा अंतीम युक्तीवादाच्यावेळी खुला ठेवण्यात येत आहे. वादी यांना सदर दस्त नियमाप्रमाणे शाबीत करण्याची मुभा देण्यात येते. तोपर्यंत सदर दस्तास निशाणी क्र.३९ देण्यात येते.) दिनांक २९.०८.२०१६ ला तहसीलदार, सावनेर यांच्याकडुन मला प्राप्त झालेल्या नोटीसची प्रत **निशाणी क्र.४० व ४१** वर आहे. दिनांक २५.०४.२०१६ रोजी तलाठी यांच्याकडे उजर घेतलेल्या अर्जाची प्रत **निशाणी क्र.४२** वर आहे. पोस्टाच्या पोच पावत्या **निशाणी क्र.४३ ते ४५** वर आहे.

**उलटतपास प्रतिवादी क्र.२ तर्फे विद्यमान वकील श्री. एम.सी.खंगारे यांच्यामार्फत सुरुः–**

प्रतिवादी क्र.२ व वकीलांचा वारंवार पूकारा केला असता गैरहजर सबब उलटतपास नाही.

<u>उलटतपास प्रतिवादी क्र.१ तर्फे विद्यमान वकील श्री. एस.पी.जैन यांच्यामार्फत सुरुः-</u>

<u>वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पूढील तारखेपर्यंत तहकुब.</u>

श्रवणोत्तर स्विकृती
समक्ष

दिनांक -१८.०१.२०२३.

(आर. बी. कुलकर्णी)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
सावनेर.

# **Certificate**

I affirm that the contents of this PDF evidence are same word to word, as per the original evidence.

Name of Stenographer (Gr.-III) :- A. S. Mahurkar.